# महाराष्ट्र विधानसभा
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, २०१९**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**दोन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. अमित साटम, प्रशांत ठाकूर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री. सुनिल केदार, अजय चौधरी, अबू आजमी, सुनिल प्रभू, रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"देशात प्रगतीशील राज्य म्हणून लौकीक असलेले महाराष्ट्र राज्य आता सायबर गुन्हयांमध्येही आघाडीवर असल्याचे समोर येणे, गेल्या दहा महिन्यांत ऑनलाईन गैरव्यवहार, फसवणूकीच्या तब्बल २,७८९ गुन्हयांची नोंद राज्यातील विविध पोलीस ठाण्यात झाली असणे, साधारणपणे दररोज १० सायबर गुन्हयांच्या तक्रारी राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यात दाखल होत असणे, दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत एकुण १०,१३९ गुन्हे दाखल झाले असणे, माहिती अधिकार तंत्रज्ञान कायद्यांतर्गत या वर्षी दिनांक १ जानेवारी ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ या दहा महिन्यांमध्ये सर्वाधिक ९८६ गुन्हे ऑनलाईन बँकिंगचे असणे, त्यानंतर डेबिट, क्रेडीट कार्डच्या फसवणूकीबाबत ८३३ तक्रारी व त्या खालोखाल सोशल मीडीयाव्दारे फसवणूक झालेले ७७९ गुन्हे नोंदविण्यात आलेले असणे, यामध्ये फेसबूक व व्हॉट्सॲपव्दारे फसवणूकीच्या ५४९ तक्रारी दाखल झाल्या असणे, राज्यभरात डेबिट, क्रेडीट, गुंतवणूक फसवणूकीबरोबरच नोकरी, विवाह नोंदणीबरोबरच सोशल मीडीयातील गुन्हयांच्या प्रमाणाचा आलेख सातत्याने वाढत असणे, त्यावर प्रतिबंधासाठी उपाययोजना केल्या जात असल्या तरी त्याला मर्यादा पडत असणे, याबाबत सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेली भिती, सायबर गुन्हयांचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने करावयाच्या उपाययोजना व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री सुनिल केदार, कुणाल पाटील, अमित झनक, अमित देशमुख, प्रा.वर्षा गायकवाड, श्री.सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. रणजीत कांबळे, राजु पारवे, विकास**

**ठाकरे, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री. अतुल भातखळकर, जयकुमार रावल, विकास कुंभारे, गोवर्धन शर्मा, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्रीमती. देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, मोहन मते, मंगेश कुडाळकर, अबू आजमी, डॉ.राहूल पाटील, श्री.प्रशांत ठाकूर, ॲड.पराग अळवणी, श्री.संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड.राहुल नार्वेकर, सर्वश्री किसन कथोरे, वैभव नाईक, सुनिल प्रभू, ज्ञानराज चौगुले, सुनिल राऊत, अजय चौधरी वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात मोठ्या प्रमाणात कांदाटंचाई सुरु असून दिवसेंदिवस बाजारभावामध्ये वाढ होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, किरकोळ बाजारात १०० ते १७० रुपये किलो दराने कांदा विकला जात असल्याने दैनंदिन गरजेचा असलेला कांदा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेलेला असणे, अन्नपदार्थांच्या भावामध्येही वाढ झालेली असणे, कांद्याची किंमत योग्य प्रमाणात ठेवण्यास प्रशासनास आलेले अपयश, शेतकऱ्यांना कांद्याचा योग्य भाव मिळवून देणे व त्याचबरोबर ग्राहकांना योग्य किंमतीत कांदा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात प्रशासनाकडे कोणतेही नियोजन नसल्याचे उघडकीस येणे, सदर भाववाढीमुळे घरातील आर्थिक गणित कोलमडलेले असल्याने गृहिणींमध्ये तणावाचे वातावरण पसरलेले असणे, कांद्याचे भाव आवाक्यात ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ डिसेंबर, २०१९ तसेच वारंवार मागण्या केलेल्या असणे, शेतक-यांना कांदा पिकाचा योग्य मोबदला मिळावा तसेच ग्राहकांनाही योग्य किंमतीत कांदा उपलब्ध करुन देण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, साठेबाज व्यापाऱ्यांवर धाडी टाकून कांदा खुल्या बाजारात विक्रीसाठी आणण्याची कारवाई राज्य शासनाने करणे अपेक्षित असणे मात्र त्याबाबतीत शासन कोणतीही कृती करीत नसणे, याबाबत प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री वैभव नाईक, नितेश राणे, महेंद्र दळवी, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री. सुनिल प्रभू, अस्लम शेख, अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, कु.आदिती तटकरे, श्री. शेखर निकम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"'क्यार' वादळामुळे समुद्रात निर्माण झालेल्या उधाणामुळे कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये निदर्शनास येणे, विशेषतः आचरा, जामडूल, पिरावाडी (जि.सिंधुदुर्ग), रत्नागिरी जिल्हा, तसेच अलिबाग, वरसोली, थळ, नवगाव, झिराड, रेवस, बोडणी, नागाव, आक्षी, रेवदंडा, थेरोंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील समुद्र किनारपट्टीवरील शेतकरी व स्थानिक मच्छिमार यांचे वादळामुळे

मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, किनारपट्टी परिसरातील मच्छिमारांच्या घरात पाणी शिरुन व त्यांचे मच्छिमारी जाळे तसेच ट्रॉलर्सखाली ठेवलेले सामान या उधाणाने वाहून जाऊन लाखो रुपयांचे झालेले नुकसान, भातशेतीत या उधाणाचे पाणी शिरुन संपूर्ण भातशेतीचेही नुकसान होणे, काही ठिकाणी पंचनामे होऊन देखिल नुकसानग्रस्ताना नुकसान भरपाई न मिळणे, 'क्यार' वादळाच्या उधाणामुळे नुकसान झालेल्या शेतकरी, मच्छिमार व सर्वसामान्य नागरीकांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

**तीन : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**चार : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ – महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१९.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ – महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे**

**विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०१९.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

पाच : **सर्वश्री सुनिल प्रभू, अजित पवार, विजय वडेट्टीवार, संजय राठोड, दिलीप वळसे-पाटील, अशोक चव्हाण, ॲड आशिष जयस्वाल, सर्वश्री धनंजय मुंडे, पृथ्वीराज चव्हाण, डॉ. संजय रायमुलकर, श्री बाळासाहेब पाटील, ॲड. के.सी. पाडवी, सर्वश्री बच्चू कडू, नवाब मलिक, सुनिल केदार, नितीन देशमुख-टाले, दिलीप बनकर, रणजित कांबळे, राजकुमार पटेल, रोहित पवार, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री संजय गायकवाड, दिपक चव्हाण, राजेश टोपे, अमित झनक, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री अनिल देशमुख, सुभाष धोटे, जितेंद्र आव्हाड, बबनराव शिंदे, कुणाल पाटील, हसन मुश्रीफ, अस्लम शेख, अमिन पटेल, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"विदर्भातील मिहान येथे दीड लाख नोकऱ्या देण्याची योजना असतांना गेल्या पाच वर्षात नोकऱ्या व रोजगारांचे प्रमाण अत्यल्प असणे, विदर्भाच्या महत्वाकांक्षी मिहान प्रकल्पाला

चालना देण्यासाठी सर्वोतोपरी गरज, विदर्भातील विदयापीठांमधून दरवर्षी लाखो पदवीधर निर्माण होणे, बेरोजगार युवकांची वाढती संख्या लक्षात घेता मिहानमध्ये रोजगार वाढीसाठी जड उदयोग, कृषी प्रक्रिया उदयोग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरु करण्याची आवश्यकता असणे, विदर्भातील विदयापीठांनी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करुन त्याव्दारे रोजगार निर्मिती करण्याची आवश्यकता असणे, जलयुक्त शिवार योजनेमुळे मोजक्याच शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोचलेले असणे, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष मोठया प्रमाणात असल्याने तो भरुन काढण्याची गरज असणे, विदर्भातील प्रलंबित १३४ सिंचन प्रकल्पांना चालना देण्याची गरज असणे, त्याकरिता राज्य सरकारने विदर्भातील सिंचन प्रकल्पांना अधिकाधिक निधी देऊन निश्चित कालमर्यादेत सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक असणे, जल नियामक प्राधिकरणाने आगामी पाच वर्षात सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी माननीय राज्यपालांना सादर केलेल्या पाच वर्षीय योजनेला गांभीर्यपूर्वक पूर्ण करण्याचे निश्चित धोरण आखण्याची गरज असणे, गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्प सन २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे फेरनिर्धारित करण्याच्या धोरणाचा तातडीने फेरआढावा घेण्याची गरज असणे, गोसेखुर्द प्रकल्प २४ महिन्यात पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारकडून निश्चित धोरण आखण्याची व निधी पुरवठा करण्याची तातडीची गरज असणे, विदर्भातील कापूस, सोयाबीन, तूर, धान, मका इत्यादी उत्पादनावर आधारित कृषी प्रक्रिया प्रकल्प भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, बुलडाणा व अकोला या जिल्हयांमध्ये निर्माण करणे, संत्रा प्रक्रिया प्रकल्पाला नवीन चालना देण्याची गरज असणे, विदर्भातील औष्णिक वीज प्रकल्पांच्या अत्याधुनिकीकरणासाठी राज्य सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज असणे, या प्रकल्पांना नियमित कोळसा पुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, विदर्भासह राज्यातील पर्यावरणाला धोका निर्माण झाला असून मागील सरकारने घोषित ३३ कोटी वृक्षलागवड योजनेत मोठा गैरप्रकार झाला असणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान संस्थानला सन २०१४ मध्ये मंजूरी मिळणे, तथापि, अद्यापही रुग्णालयाचे काम अदयाप सुरु न होणे, अमरावतीत वस्त्रोदयोग पार्कला शासनाकडून प्रोत्साहन मिळण्याची तेथील उत्पादकांची अपेक्षा असणे, विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, गोंडवाना विदयापीठ तसेच कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विदयापीठ तसेच महाविदयालयामध्ये मोठया प्रमाणात रिक्त जागा असणे, त्यामुळे उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणे व त्याचा परिणाम विदर्भातील रोजगार निर्मितीवर होणे, नागपूरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातले अपग्रेडेशनचे काम रखडणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम जमिनी अभावी रखडणे, मागील ५ वर्षात विदर्भासाठी मोठमोठया घोषणा करण्यात येणे परंतु त्या पुर्ण न होणे, विदर्भात वन्यजीव पर्यटन विकासाकरिता उपलब्ध असणारी विपूल साधनसंपत्ती व संधी यांचा उपयोग करुन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संसाधनासहीत विकास करणे, पर्यटकांना आकर्षित करुन अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा, राज्याच्या आर्थिक क्षमतेत वाढ व्हावी व पर्यटन तसेच सेवा उदयोग वाढावा, राष्ट्रीय वन्यजीव पर्यटन स्थळाप्रमाणे वन्यजीव सर्किट तयार करुन ताडोबा, पेंच, नागझिरा इ.वन पर्यटन स्थळे विकसित करणे, विदर्भातील तिर्थक्षेत्रे व पर्यटन

स्थळांचे सर्किट तयार करुन रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील रस्ते विकासाचा अनुशेष लक्षात घेता राज्य महामार्गाचे चौपदरीकरण करण्याची आवश्यकता असणे, नागपूर येथील इंदिरा गांधी वैदयकिय महाविदयालय व इस्पितळाला आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असणे, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी महत्वपूर्ण असलेल्या दुग्धव्यवसाय वाढीसाठी एन.डी.डी.बी च्या सहकार्याने मराठवाडा व विदर्भात पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाच्या कार्यक्रमाला चालना देऊन शेतकऱ्यांना स्थायी उत्पन्न निर्माण करण्याची आवश्यकता असणे, मिहान मध्ये योगगुरु रामदेव बाबांच्या पतंजली फुडपार्क बंद झाल्याने तेथील कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणे परिणामी हजारो कर्मचाऱ्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ येणे, विदर्भातील रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत राहिल्यामुळे होणारे रस्ते अपघात, मेळघाट व्याघ्रप्रकल्पातील गावांचे तसेच पेढी प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे काम गेल्या ५ वर्षापासून रखडणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारित सुतगिरण्या व कापूस उदयोगाला चालना देण्याची गरज असणे, विदर्भाच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व करावयाची उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १६ डिसेंबर, २०१९

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा